# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. विद्या बापट

शंख बोलला सारेगम वीणेमधुनी पधनीसा
पूर्ण होई सप्तक आणि संगीताचा श्रीगणेशा

सारेगमपधनीसा सानीधपमगरेसा

पानांची सळसळ
पाण्याची खळखळ
पक्षांची किलबिल
वाऱ्याची झुळझुळ
त्यातुन आलापांची गुंफण
सारेग रेगम पधनी धनीसा
आलापांच्या मधुर सुरानी भरल्या दाही दिशा

दिवस रातीच्या प्रहरांना
सहा ऋतूंच्या सहा कल्पना
नऊ रसांच्या नऊ भावना
करण्या त्यांच्या भाव वर्णना
विशुद्ध कोमल आणि तीव्र स्वर
रागरागिण्या त्यातुन स्फुरल्या सुरेल सुंदरशा

पावसात मेघांची गडगड
त्यात विजेची उठली कडकड
श्वासा श्वासामधली थरथर
काळजातली अखंड धडधड
जुळवुन आपली लय त्याच्याशी
धागिनतिनकधिन धागिनतिनकधिन
लयीतुनी त्या जन्मा आली तालाची परिभाषा

Anahat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

शब्दांमधुनि सूर बोलती
शब्दसुरांचा गुंफुनिया पट
मात्रांसंगे ताल डोलती
शब्दांना तालाची चौकट
शब्द सूर अन् ताल मिळोनी
बंदिश झाली सिद्ध कराया अमृताची वर्षा

सारेगमपधनीसा सानीधपमगरेसा

Anahat Music Therapy